# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,

महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


आस्थापना क्र 684 दिनांक :०५/०३/२०२५

**जाहिरात क्र.८०४/पी.आर दि.२३.१२.२०२४ चे अनुषंगाने**

**ऑनलाईन परिक्षेचा अभ्यासक्रम तसेच Group Level Timer बाबत सूचना**

जाहिरात क्र.८०४/पी.आर दि.२३.१२.२०२४ चे अनुषंगाने जाहीर निवेदन ऑनलाईन परिक्षेचा अभ्यासक्रम नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात क्र.८०४/पी.आर दि.२३.१२.२०२४ प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने दि.२६.१२.२०२४ ते दि.१५.०१.२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. उमेदवारांकरीता सविस्तर जाहिरात नागपूर महानगरपालिकेच्या www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून सदर जाहिरातीमधील अ.क्र.१५.१ वर ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप नमूद करण्यात आले आहे.

सदर नागपूर महानगरपालिकेच्या जाहीरात ऑनलाईन परिक्षेसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना कळविण्यात येत आहे की, गट क मधील एकूण ०५ पदांसाठी सोबत जोडलेल्या **प्रपत्र 'अ'** मध्ये नमूद केलेप्रमाणे परिक्षेच्या अभ्यासक्रमाचे (Syllabus) जोडण्यात आलेला आहेत. ऑनलाईन परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी. सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, तांत्रिक ज्ञान व पदाशी संबंधित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील एकूण 100 प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाचे असून प्रत्येक प्रश्नास 02 गुण असतील. (एकूण गुण 200) परिक्षेसाठी एकत्रितपणे 120 मिनिटांचा कालावधी अनुज्ञेय राहील.दिव्यांग प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी प्रत्येक तासाला 20 मिनिटे अतिरिक्त वेळ अनुज्ञेय राहील.तसेच ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक व प्रवेशाबाबत सूचना सोबत जोडलेल्या **प्रपत्र 'ब'** मध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत.

तसेच दिव्यांग प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे वेळी ज्यांनी सहाय्यक (Scribe) पर्याय निवडलेला आहे त्यांना ऑनलाईन परिक्षेच्या ०७ दिवस अगोदर नागपूर महानगरपालिकेच्या मेलआयडी (recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com) यावर सादर करावे. **मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रांसह सुस्पष्ट लेखी मागणी करणे आवश्यक आहे,** तसे न केल्यास दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारास ऑनलाईन परिक्षेकामी प्रत्येक तासाला 20 मिनिटे अतिरिक्त वेळ अनुज्ञेय राहणार नाही. याची दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**अति.आयुक्त (सामान्य)**
**महानगरपालिका, नागपूर**